
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 1 | OCTOBER - 2021

# सुभाष भेंडे ह्यांचे वाङ्मयीन जीवन

**प्रा. डॉ.पवार के.के.**
**सहयोगी प्राध्यापक , मराठी विभाग , उमा महाविद्यालय पंढरपूर.**

**गोषवारा:**

सुभाष भेण्डे यांच्या वाङ्मयाचा आतापर्यंत वाङ्मयीन दृष्टिकोनातूनच विचार झालेला आहे. त्यांच्या वाङ्मयप्रकारामध्ये विविध सामाजिक स्तरांचे आलेले चित्रण, त्यातूनच लेखकाची वाङ्मयाकडे पाहण्याची सामाजिक दृष्टी आणि त्यांचे समाजशास्त्रीय आकलन याचा विशेषत्वाने अभ्यास झालेला नाही; त्यामुळे सुभाष भेण्डे यांच्या साहित्याचा अभ्यास सामाजिक दृष्टीने करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मनुष्य जसा समाजशील असतो तसाच विचारशीलही असतो. आपल्या भावना आणि विचार यांचे प्रकटीकरण व्हावे असे त्याला वाटत असते. त्यातून भाषेची आणि साहित्याची निर्मिती होते.



**परिचय:**

मानवाच्या विविध गरजांच्या पूर्तीसाठी विविध संस्था निर्माण झाल्या, तसेच स्वतःचे विचार भावना इतरांना सांगण्याच्या गरजेतून भाषेची निर्मिती झाली. या भाषेद्वारे मिळविलेल्या ज्ञानाचा संग्रह व पुढील पिढीकडे त्यांचे हस्तांतरण हे गरजेचे झाले. त्यातूनच साहित्य निर्माण झाले. उत्कट भावनांचा आविष्कारही साहित्याद्वारे होऊ लागला. साहित्य हे परस्पर संबंध प्रस्थापित करण्याचे एक उत्तम साधन बनले. सुरुवातीला ही साहित्य निर्मिती मौखिक पातळीवर होती. लेखनकला अवगत झाल्यावर साहित्यनिर्मितीद्वारे होणारे हस्तांतरण अधिक सुलभ बनले व समाज विकसित होण्याचा वेग वाढला. पंधराव्या शतकात छपाईचा शोध लागला आणि समाज विकसित होण्याचा वेग वाढला आणि साहित्याद्वारे विचार व्यापक स्वरूपात सर्व दूर पोहोचू लागले. आर्थिक गरजेतून आर्थिक व्यवस्था, राजकीय गरजेतून राजकीय व्यवस्था तसेच भावनिक व वैचारिक गरजेतून साहित्य हेही समाजजीवनाचे एक अंग बनले. एकीकडे समाजाचा एक घटक असलेल्या व्यक्तीकडून साहित्यनिर्मिती होते, तर दुसरीकडे साहित्यामुळे तो समाज विकसित होतो.

साहित्य आणि समाज यांच्यात जन्मजनक सबंध आहे. समाजजीवनाच्या आशयाशिवाय कलाकृतीला जन्ममूल्यच प्राप्त होत नाही. साहित्यिक हा ज्या समाजामध्ये घडतो, त्याच्या व्यक्तीमत्त्वाला तसा आशय आणि आकार प्राप्त होतो. त्या

समाजामध्ये त्याच्या मनाला अनेक पैलू पडत असतात. साहित्यिकाच्या व्यक्तिगत जीवनावर सामाजिक जीवनातील घटकांचे पडसाद उमटत असतात. साहित्यिकाच्या जाणिवेत आणि नेणिवेतही समाजाशी त्याची असलेली अनुकूल वा प्रतिकूल नाती या ना त्या रूपात वावरत असतात.

साहित्यकृतीची कथानके, साहित्यकृतीमधील व्यक्ती, व्यक्तींचे समूह, व्यक्ति-व्यक्तींचे आणि समूहा-समूहांचे संबंध, व्यक्तीच्या व समूहाच्या भावना-संवेदना, विचार सुखदुःखे आणि असंख्य समस्यांचे कोलाहल या सर्वच गोष्टी समाजात असतात.

नाटक, कथा, कादंबरी, ललित लेखनात प्राप्त सामजिकतेला अधिक वाव असतो. कारण त्यातील पात्रांची निर्मिती ही केवळ कल्पनेतून न होता, प्रत्याक्षानुभूती, अवलोकन, दुसऱ्याशी सहानुभूती व समरसता यातून निर्माण झालेली असते. समाजाच्या वास्तवाचे आकलन नेमके असेल, तर ते त्या लेखकाच्या साहित्यात प्रतिबिंबीत होते ह.ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांतील विधवांची दुःस्थिती ही केवळ त्या कादंबरीतील पात्रांची दुःस्थिती न राहता, ते सर्व समाजजीवनाचे प्रतिबिंब ठरते 'बटाट्याची चाळ'च्या निमित्ताने पु.ल. देशपांडे स्वतःची वेदना व्यक्त करत असतात. समाजातील उद्रेक, समाजाची सुखदुःखे, समाजाच्या जाणिवा अनेक प्रकारे साहित्यात व्यक्त होतात.

डॉ. सुभाष भेण्डे यांच्या साहित्यामध्ये या सामाजिक जाणीवा व समाजाचे वास्तववादी चित्रण कशा प्रकारे झाले आहे, (त्यांच्या कादंबऱ्यातून सामाजिक वास्तव कसे प्रकट झाले आहे) हे पाहाण्यासाठी भेण्डे यांच्या जीवनचरित्राचा उपयोग होऊ शकतो. त्या दृष्टीने त्यांच्या चरित्राचा शोध घेणे आवश्यक ठरते. अशा प्रकारचे व्यक्तित्त्व तयार होण्यासाठी ज्या ज्या घटनांनी, विचारांनी, संस्कारांनी त्यांना साथ दिलेली आहे, त्यांचा मागोवा त्यांच्या चरित्रातून प्रकट होणार आहे. यास्तव त्यांच्या साहित्याचा वेचक अभ्यास करण्यापूर्वी जीवनचरित्राचा मागोवा घेणे आवश्यक वाटते.

समाजजीवनातील वेगवेगळे स्तर निवडून त्या अंगांचे वास्तव चित्रण करणाऱ्या कादंबरीकारांमध्ये सभाष भेण्डे यांचा समावेश करावा लागेल. कादंबरीकारांत सुभाष भेण्डे यांचे स्थान अग्रगण्य मानले जाते. डॉ. सुभाष भेण्डे यांनी १९७० नंतर कादंबरी लेखनाला सुरुवात केली.

विनोदी कथाकार आणि गंभीर वळणाचे कादंबरीकार म्हणून ते लोकप्रिय ठरले आहे. 'पैलतीर' आणि 'उद्ध्वस्त' या दोन कादंबऱ्यांचे दूरदर्शनवरुन प्रक्षेपणही झाले आहे. 'आमचे गोय आमको जाय'(१९७०), 'अदेशी' (१९७१), अंधारवाटा' (१९७८), 'चकवा' (१९८१), 'पैलतीर' (१९८२), 'उद्ध्वस्त' (१९८३), 'जोगीण' (१९८४), 'बॉन्साय' (१९८८) या सुभाष भेण्डे यांच्या आजपर्यंतच्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या आहेत.

१९६०च्या सुमारास मराठी वाङ्मयातील कादंबरी क्षेत्रातील जुन्या परंपरेला नवे धुमारे फुटले. नवीन अनेक ललितकृतींच्या फळांनी लगडलेल्या फांद्यांमध्ये त्या अंकुराचे रूपांतर झाले. लघुकथाकार या नात्याने प्रथितयश असणाऱ्या लेखकांचे कादंबरीलेखनही सुरू राहिले. वि.वि. बोकील, चंद्रकांत काकोडकर, उद्धव शेळके यांच्यासारखे लेखक आपली रंजनवादी कलानिर्मिती करीत राहिले. ना.सी. फडके, वि.स. खांडेकर यांचेही कादंबरीलेखन तितक्याच जोमाने चालू होते. 'ययाती', 'अमृतवेल' यांसारख्या मातब्बर कादंबऱ्यांची निर्मिती १९६० ते ७५ मधीलच आहेत. पु.भा. भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगुळकर यांनी जुन्या सौंदर्यवादाची ध्वजा उंचावण्याचे काम करीत असतानाच नवा अर्थ, नव्या जाणिवा यांच्यायोगे आशयघन कलाकृती निर्माण केल्या. ह्या जुन्या वाङ्मयप्रवाहाला अस्तित्त्ववादी, जनवादी, ग्रामीण, ऐतिहासिक, चरित्रात्मक दलित, मनोविश्लेषणात्मक अशा अनेकानेक उपशाखा निर्माण झाल्या व त्यावरील जुन्या व काही नव्या लेखकांनी अतिशय समृद्ध केल्या.

'आमचे गोंय, आमकां जाय' या कादंबरीत गोवामुक्तीच्या किंचित आधी आणि किंचित नंतरच्या कालावधीतल्या घडामोडींचे चित्रण आहे. पिढीजात श्रीमंत आणि चोरत व्यापार करून अल्पकाळात, अमाप पैसा मिळवणारे 'उपटसुंभ' श्रीमंत, देवसाथीचे जीवन आणि त्यांच्या संततीचे प्रतिष्ठाहीन, दिशाहीन जीवन, पैसा मिळवण्यासाठी परदेशात वर्षानुवर्षे वास्तव करणारे किरिस्ताँव आणि मागे राहिलेल्या त्यांच्या तरुण बायका, : मुक्तिसंग्रामाआधीचे आणि त्यानंतरचे तिथले वातावरण आणि स्वार्थी-निःस्वार्थी लोकांचे : त्या काळातले वर्तन ह्या सर्वांचे प्रतिबिंब समाज केंद्रित आहे गिहाइकांची उघडी शरीरे (चकमत होती. अंगात फाटके कुडते, कंबरेला वीतभर कास्टी, गालावर अरबट-चरबट : दाढा वाढलेली, बहुतेकांच्या गळ्यात काळा दोरा, अवर्षणामुळे जमिनीला भेगा पडाव्या : तशा शरीरावर जागोजागी पडलेल्या? या वर्णनातून गोव्यातील पराकोटीचे दरिद्री जीवन : जगणाऱ्या लोकांच्या विदारक अवस्थेचे चित्रण भेण्डे करतात. बंदा रुपया वाजवून कोणी पिऊन चेडवांची व काजाराची चावट गाणी गात जाणारा खळू नाईक अशा प्रसंगांनी गोव्यातील लोकांची संध्याकाळ सुरू होते, लोकांचे व्यवसाय, मुक्तपणे दारु पिणे, तिठ्यावर जाऊन दारू पिणाऱ्या स्त्रिया या साऱ्या वर्णनातून तेथील जीवनपद्धतीचा वेगळेपणा भेण्डे चित्रित करतात. तसेच खळनाथाच्या यात्रेच्या वेळी एकत्र जमणारे लोक, त्यांच्यातील एकोपा, गावजेवण, भजन, दशावतारी काल्याचे कीर्तन या चित्रणातून तेथील परंपरेचे, सांस्कृतिक जीवनाचे, त्यांच्या श्रद्धा-अंधश्रद्धांचे, लोकांच्या श्रद्धाळू मनोवृत्तीचे, भोळेपणाचे, अज्ञानाचे, त्या अज्ञानाचा फायदा घेणाऱ्या मिनेर भाटकरांचे, भाविणीच्या दयनीय अवस्थेचे चित्रण भेण्डे करतात. अशा प्रकारे गोव्यातील पारंपरिक जीवनाचे चित्रण या कादंबरीमधून आले आहे. मारियासारख्या ज्या असाहाय्य, अनाथ किरिस्ताँव स्त्रियांनी फिरंगी राज्यकर्त्यांशी (शरीर) संबंध जोडले होते, त्यांची स्वातंत्र्योत्तर काळातील करुणाजनक वाताहत ही खरे प्रचंड कादंबरीची पार्श्वभूमी म्हणून शोभण्यासारखी आहे. मारिया अशा दुर्दैवी स्त्रियांची प्रतिनिधी म्हणता येईल सत्ताधारी धनिक राज्यकर्त्यांचा आश्रय तुटून तिला वेश्याव्यवसाय करण्यावाचून गत्यंतर नव्हते. मारियाप्रमाणे अन्य किरिस्ताँव बायका बंदरा-बंदरातून आणि बसेसच्या स्टॉपवर सहकुटुंब भीक मागत फिरत होत्या.

सुभाष भेण्डे यांची १९७१ साली 'अदेशी' ही कादंबरी आली. 'अदेशी'मधून सुभाष भेण्डे यांनी 'ब्रेन ड्रेन'ची समस्या उलगडून दाखविली आहे. देश स्वतंत्र झाला तरीही सर्वसामान्य लोकांचा वनवास संपलेला नाही. शिक्षणाने 'साक्षर' झालो परंतु सत्ताधारांच्या नामधारी लोकशाहीत परिस्थितीने नाउमेदीची जाणीव करून दिली. शिक्षणामुळे उच्च जीवनमानाचे आकाश दाखवले. सत्ताधारी, राजकारणी लोकांच्या स्वार्थीपणामुळे सर्व कामांचा बोजवारा उडून गेला. न सुटलेले प्रश्न, भविष्यातील अडचणी यांच्या मगरमिठीत समाज पिचून गेला. प्रत्येकजण आपले अस्तित्व टिकवण्यासाठी, स्वार्थासाठी लाचार, अगतिक झाला आहे.

या कादंबरीतील नायक महेश आजच्या सुशिक्षीत तरुण पिढीचे प्रतिनिधत्व करत आहे. तरुणाला या ठिकाणी मान नाही. त्याच्या चांगुलपणाचे या ठिकाणी चीज नाही. या विचाराने ग्रासून गेला आहे. त्याच्या बुद्धीचा, ज्ञानाचा येथे आदर नसून त्याची चेष्टा करतात. त्याची या देशात अडचण होत आहे. तो या अनुभवाला वैतागून गेला आहे. परंतु, त्याच्या ज्ञानाला परदेशात खूप किंमत आहे. हे माहित असल्याने त्याचे मन परदेशात जाण्यासाठी उचल खात आहे.

देवळातील भटजींचे पहिले अपत्य महेश. खूप हुशार, स्कॉलरशीपच्या जोरावर त्याने आपले पहिले शिक्षण पूर्ण करून पुढील इंजिनिअरींगचे अद्ययावत ज्ञान फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंडमधून घेतले. तेथील परिस्थितीशी तो समरस होतो. वडील व भावाच्या अट्टाहासामुळे तो आपल्या देशात परततो. परंतु काही दिवसात तो येथील दरिद्री, क्षुद्र, मागासलेल्या माणसाकडून त्रास होऊ लागला. येथील जीवन त्याला सध्या कंटाळवाणे वाटत होते. त्याच्या 'अॅडव्हान्स्ड नॉलेज'चा येथे काहीही उपयोग नाही.

उलट त्याच्या ज्ञानाचा अल्प मोबदल्यात किंवा फुकटात वापर करून घेणाऱ्या समाजवृत्तीला तो कंटाळतो. पुन्हा परदेशात जाण्याचे बेत ठरवतो.

या कादंबरीतील नायकाला आपल्या कुटुंबाविषयी प्रेम आहे. परंतु परिस्थितीच्या रेट्यापासून तो अलिप्त राहण्याचा प्रयत्न करत असतो. महेश सर्वगुणसंपन्न नाही. त्याच्या गुण-दोषांचे लेखकाने फार कलात्मकरित्या चित्रण केले आहे.

'जोगीण' ही कादंबरी १९७४ साली प्रसिद्ध झाली. गोव्याच्या पार्श्वभूमीवर आधारलेली ही आणखी एक कादंबरी आहे. एका ख्रिश्चन कुटुंबाच्या जीवनावर आधारित आहे. हिंदू व ख्रिश्चन समाजातील जीवनपद्धतीची तुलना येथे केलेली दिसते. ख्रिश्चन समाजाच्या कुटुंबातील 'नन' म्हणून सोडलेल्या एका तरुण मुलीच्या मनाचे चित्रण लेखकाने 'जोगीण' या कादंबरीतून केले आहे. धर्मवृत्तीतून निर्माण होणाऱ्या कोंडमाऱ्याचे चित्रण करण्याचा या कादंबरीचा मुख्य हेतू आहे. बर्नडिट नावाच्या ख्रिस्ती कुटुंबात जन्माला आलेल्या, भावी आयुष्याची सुंदर स्वप्ने पाहणाऱ्या एका सुंदर तरुणीची ही कथा आहे. तारुण्यात आल्यावर तिला कळले की तिच्या वडीलांनी पवित्र मेरीला नवस केला होता. 'रॉक आजारातून बरा झाला, तर मी बर्नीला जोगीण करीन' असा नवस तिच्या वडिलांनी केलेला असतो. त्यामुळे बर्नी जोगीण बनते. धर्माच्या, पुण्याच्या, पावित्र्याच्या आवरणाखाली तिचे सारे आयुष्य दडपून जाते. बर्नीच्या आयुष्यातील कारुण्य भेण्डे यांनी अत्यंत सहृदयतेने प्रस्तुत केले आहे. सौंदर्यानं नटलेली, यौवनाने ओथंबलेली बर्नी. तरुण मनाला सहज मोहित करणारी मुलगी. मेडिकल कॉलेजमधील टोनी तिच्यावर प्रेम करीत असतो. तिचा आतेभाऊ ऑस्टिनही तिच्यावर प्रेम करतो. पण हे नाकारुन तिला 'जोगीण' बनावे लागते. कॉन्व्हेंटमधले सारे नियम ती काटोकोरपणे पाळते. तेथील धार्मिक वातावरणाचा, शिस्त यांचा तिटकारा वाटतो. सारी बंधने तिच्यावर लादली जातात. सिस्टर फातिमा, येथील जीवन नाकारण्याचा प्रयत्न करते. सिस्टर लाईझा तारुण्याच्या भावना दाबून टाकते. तिला हिस्टेरिया होतो. या मठातील वातावरण अतिशय प्रत्ययकारी स्वरूपात भेड्यांनी चित्रीत केले आहे.

'अंधारवाटा' ही १९७८ साली प्रकाशित झालेली कादंबरी १३२ पानांत आकारात आलेली, अच्युत तारकुंडे व जयू या तरुण जोडप्याची कथा आहे. महानगरीय जीवन जगणाऱ्या एका समाजगटाचे चित्रण भेण्डे यांनी या कादंबरीत केले आहे. उच्चभ्रू सोसायटीमधील सवयी, मुक्त लैंगिक व्यवहाराचे प्रदर्शन या समाजात अपरिहार्य समजले जाते. अधिकाधिक श्रीमंत होण्यासाठी भल्याबुऱ्या मार्गांचा वापर येथे सहजपणे केला जातो. अशावेळी नैतिक मूल्यांची तमा बाळगली जात नाही. अस्तित्वासाठी एकमेकांमध्ये जीवघेण्या स्पर्धा सुरू असतात. त्यामुळे अनेक प्रकारचे ताणतणाव त्यांना सहन करावे. लागतात. या साऱ्या गोष्टींचे प्रभावी चित्रण भेण्ड्यांनी प्रस्तुत कादंबरीतून केले आहे. समाजातील वास्तवाचे चित्रण सुभाष भेण्डे करतात. संपूर्णपणे भ्रष्टतेचे व लैंगिकतेचे अंतःप्रवाह असूनही जबरदस्त सामाजिक जाणीवांनी 'अंधारवाटा' ही कादंबरी नैतिक आशयसूत्र मांडते. या कादंबरीतील नायिका जयू श्रीमंत घरातील लावण्यवती आहे. अच्युत तारकुंडे या हुशार पण सामान्य परिस्थितीतल्या तरुणाच्या ती प्रेमात पडते. आपल्या आयुष्याची सुरुवात चाळीतील छोट्याशा खोलीत करते. त्यांच्या जीवनाचे आंबट, गोड वास्तव वर्णन त्यांनी केले आहे. अच्युतच्या कमी पगारात तिचे चैनी, विलासी जीवन भागू शकत नाही. याच परिस्थितीत जयूची आणि जोत्स्नाची गाठ पडते आणि तिच्या आयुष्याला कलाटणी मिळते. 'आयुष्यात साऱ्या सुखांची चव चाखली पाहिजे; ध्येय, आदर्श इनको मारो गोली' हा जोत्स्नाने दिलेला कानमंत्र तिला खरेच मार्गदर्शक ठरतो. जयूला त्याचा प्रत्यय जोत्स्नाच्या घरी असलेल्या पार्टीत येतो. तेथील मोकळ्या वातावरणात नाना नहेचे लोक भेटतात. एकदा या वेगवान संपत्तीच्या जगात प्रवेश केल्यावर जयू माखिसाच्या झोपण्याच्या खोलीत जागी होते. या घटनेसाठी फार दिवसांचा अवधी लागत नाही. माखिजाने तिला एका दिवसाच्या अनुभवानेच ठामपणे सांगितलेले असते की, 'यू बिलाँग टू अवर सोसायटी'. अच्युतही बायकोच्या साहाय्याने त्या

सोसायटीत शिरतो. या नव्या आयुष्याची अच्युतला इतकी सवय होते की तोच आपल्या पूर्वीच्या मित्राला, गायतोंडेला सांगतो हे नवे जगच योग्य आहे. एकदा जयू मखिजाकडून रात्री अकरा वाजता येते. ड्रिंक घेतल्याखेरीज मखिजाने तिला सोडलेले नसते. अच्युतला चमत्कारिक, अस्वस्थ वाटते पण मिळालेल्या नव्या आयुष्याची ही किंमत आहे हेही त्याच्या ध्यानात येते. एकंदरीत पार्टीच्या प्रवाहातून संपत्तीच्या मागे धावणाऱ्या माणसांचा नीति-व्यवहारावर, लेदर करन्सीच्या घडामोडींवर भेण्डे यांनी उत्कृष्ट भाष्य केले आहे. अच्युतला काही कारणाने नोकरी गमवावी लागते. परंतु जयूला कंपनीचे नवे चेअरमन ढोलकिया यांची किंमत चुकती करावी लागते. आपण काय गमावले आहे या जाणीवेने दोघेही अस्वस्थ होतात. या कादंबरीतून आजच्या मध्यमवर्गीय सांस्कृतिक समस्येचे हे प्रवाही, परिणामकारक चित्र सुभाष भेण्डे यांनी उत्कृष्टपणे रेखाटले आहे.

१९८१ साली प्रकाशित झालेली 'चकवा' ही कादंबरी. चकवामध्ये गोव्यातील प्रतिष्ठीत सारस्वत समाजातील स्त्रियांच्या कुचंबणेचे चित्र आहे. 'चकवा' हे दुर्गा ऊर्फ व्हनीबाय या स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण करणारी कादंबरी आहे. सनातनी परंपरावादी, पुरुषी मनोवृत्तीच्या लाड घराण्याला सावरताना तिला कोणत्या प्रकारच्या यातना सहन कराव्या लागतात, याचे परिणामकारक चित्रण सुभाष भेण्डे यांनी प्रस्तुत कादंबरीत केले आहे. या कादंबरीत व्हनीबाय, तिची सून अंजनी, आणि व्हनीबायची मुलगी कमली या तीन स्त्रियांचे चित्रण आहे. व्हनीबायवर एकामागून एक लादलेली बाळंतपणे, घरात लग्नाचे वय होऊन गेलेली कमळी, घरातील पुरुषप्रधान संस्कृती. यामुळे तिच्या मनात आत्महत्येचा विचार डोक्यात येतो. तिचे वैकुंठशी प्रेमसंबंध असतात, परंतु लग्न दुसऱ्याशी, एका तिरकस स्वभावाच्या माणसाशी होते. त्यामुळे तिच्या जीवनाची फरफट होते. सुभाष भेण्डे यांनी 'मानसिक कोंडमाया'चे चित्रण नीटपणे केले आहे.

'पैलतीर' ही १९८२ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. पत्रकारांच्या जीवनावरील ही कादंबरी असून 'पैलतीर'मध्ये पत्रकारांच्या जीवनाचे आणि तेथील व्यवहाराचे, त्या क्षेत्रातील नीति-अनीतीचे जग आपणासमोर ठेवतात. पत्रकारितेच्या व्यवसायातील निष्ठा, मूल्यांच्या घसरणीचे प्रभावी चित्रण भेण्डे करतात.

"पैलतीर या कादंबरीमध्ये 'वॉटर पोल्युशन' ह्या समस्येचे चित्रण येते. साखर कारखाने, वृत्तपत्रीय व्यवसाय अशा समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक नाड्या ज्यांच्या हाती असतात, अशा संस्थांचे मालक भल्या-बुऱ्या मार्गांचा अवलंब कशा प्रकारे करीत असतात, ते त्यांचे व्यवहार अनैतिक वाटावेत अशा स्वरूपाचे कसे असतात या गोष्टींची मांडणी भेण्डे यांनी प्रस्तुत कादंबरीत केली आहे. नानासाहेब सरंजामे हे एक ध्येयवादी पत्रकार. समाजकल्याण मंडळाचे सदस्य बाळासाहेब दर्शने, वॉटर पोल्युशनची पर्वा न करता साखर कारखान्याला जोडून कागद कारखाना काढण्याचा प्रयत्न करणारे भवानी साखर कारखान्याचे चेअरमन साहेबराव दुमणे, युद्धकाळात स्मगलिंग करून अमाप पैसा कमावणारे बप्पा, अग्रवाल, वृत्तपत्रीय व्यवसायातील मूल्यांची पर्वा न करता ऐषारामी जीवन जगणारा कौंडिल्य, 'रणभेरी'चे संपादक अप्पासाहेब पाटील अशा समाजविघातक अपप्रवृत्तींच्या विरोधात नानासाहेब कशी एकाकी झुंज देतात याचे चित्रण या कादंबरीत आहे.

'उद्ध्वस्त' १९८४ ला प्रकाशित झालेली कादंबरी आहे. सुभाष भेण्डे यांच्या या कादंबरीत गोव्यातील दत्तवाडी नावाच्या खेड्यातील वर्णन आहे. कादंबरीच्या सुरुवातीला खेड्याच्या समृद्धीचे वर्णन येते आणि नंतर त्या गावाचे उजाडलेले स्वरूप भेण्डे चित्रित करतात. गावात एकोपा होतो. तेथील लोक सणवार, देवीची यात्रा, गणेशचतुर्थी, दिवाळी हे सण, विविध सांस्कृतिक कार्यक्रम एकजुटीने साजरे करतात. नारळ, सुपारी, पपनस, तवसी अशा अनेक वृक्षसंभाराने डवरलेल्या दत्तवाडीचे या कादंबरीच्या प्रारंभी वर्णन आहे.

या दत्तवाडीत खाणउद्योग सुरू होतो. त्यामुळे गावाला समृद्धी येते. सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर परिणाम होतो. खाणकामाचा दुष्परिणाम होतो. कुळागार उजाडतात. सर्व झाडे उन्मळून पडतात. लोखंडाच्या कणांचे थर जमिनीवर साचल्याने त्या नापिक : होतात. "जगण्याचे संदर्भ बदलल्याबरोबर माणसांच्या भावनाही बदलत गेल्या, मूल्यांसंबंधीच्या कल्पना बदलल्या आणि अनैतिकतेला व्यवहारी प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली.'

निसर्गातील असमतोलामुळे कृषी जीवनावर कसा विपरीत परिणाम होतो आणि जगण्याचे संदर्भ बदलले की जीवनातील मूल्य, कल्पनाही कशा बदलतात याचे चित्रण 'उद्ध्वस्त' या कादंबरीत येते. खांडेकरी वळणाची ही कादंबरी आहे. पण केवळ स्वप्नाळू आदर्श जीवनाचे चित्रण न करता काही एक वास्तव या कादंबरीतून आले आहे.

'बॉन्साय' ही कादंबरी १९८८ साली प्रकाशित झाली. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे विदारक चित्र भेण्डे यांच्या 'बॉन्सॉय'मध्ये आले आहे. इथे कुणी कुणाला खुरटे केलेले नाही. त्या त्या व्यक्तींना स्वत:चीच नैतिक मुळे कापून स्वतःला खुरटे केले आहे. 'बॉन्साय'मध्ये बुद्धिमंतांची सारासार विवेकबुद्धी भ्रष्ट झाल्याचे चित्र आहे. येथील माणसे सज्जन राहात नाहीत, तर ती बदलतात, सुखाला चटावतात. अधिक सुखाच्या मागे धावतात. भाजीभाकरीला लाचार होत नाहीत, तर ती चटण्या-कोशिंबिरीला लाचार होतात. याकरिता आपल्या पायाखाली काय तुडवले जाते आहे याचेही भान राहात नाही. भेण्डे यांनी प्राध्यापकाचे, तिथल्या खुरट्या जगाचे, विविध व्यक्ती व प्रसंगांची गुंफण करुन जे चित्रण केले आहे ते सखोल वाटते. प्रा. मोडक, प्रा. सोमण हे आदर्शवादी, तर सांगळे बहुजन समाजातले, महत्त्वाकांक्षी, काहीही करायला मागेपुढे न पाहाणारे. शिक्षण सचिव खंडागळे बहुभाषाकोविद व आदिवासी समाजतले, पण तेही 'जाऊ तिथे खाऊ' हे तत्त्व विसरणारे. या सर्वांत सहानुभूती मिळणारी व्यक्तिरेखा आहे. भेण्डे यांच्या व्यक्तिरेखा या व्यामिश्र असतात. याबरोबरच विद्यापीठातील भानगडी, मंत्र्यांच्या डि.लिट.चे प्रकरण, मंत्र्यांच्या मेव्हणीला फसवण्याचे प्रकरण, कुलगुरू मोडक व मंदा सुळे यांचे विवाहोत्तर मैत्रीचे लफडे. या विद्यापीठातील घटनांचा कोळसा उगळावा तेवढा काळाच आहे. "एकूणच विद्यापीठ क्षेत्रातील आजचे निराशजनक वातावरण आणि मूल्यांची परवड विचारी वाचकाला अस्वस्थ करुन सोडतेच, पण त्यापेक्षाही नीति-मूल्ये मानणाऱ्या माणसाची कशी परवड होते हे दाखवून भेण्डे आपण कोणाच्या बाजूनं आहोत हे स्पष्ट करतात."

'किनारा' ही कादंबरी १९९४ ला प्रकाशित झाली. या कादंबरीत दारिद्र्यात जगणाऱ्या, एकेकाळी सरळमार्गी असणाऱ्या मार्तंडचा मूल्यहास दाखवून भेण्डे यांनी एक सावधगिरीचा इशारा दिला आहे. या कादंबरीचा आवाका मोठा आहे. त्यातील उद्योजकांचे जग बऱ्यावाईट घटकांसह भेण्डे यांनी रंगविले आहे. आर्थिक व्यवहारातील तपशील व संवाद कादंबरीच्या प्रकृतीशी एकदम एकरूप झालेले असे क्वचितच मराठी साहित्यात दिसतात. मराठीत प्रथमच उद्योजकांच्या जगाचे इतक्या सच्चेपणाने केलेले चित्रण आणि खलनायकालाच नायक करण्याचा प्रयत्न दोन्ही लक्षात राहतात. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या व्यापार व भ्रष्ट आचारांचे समर्थन करणारी, त्याचेच एक तत्त्वज्ञान बनविणारी, पाश्चात्य जगाच्या आर्थिक, सांस्कृतिक आक्रमणाची आणि एका सर्वव्यापी स्थित्यंतराची ही परिणती वरवर पाहता लोकप्रिय भासणाऱ्या कादंबरीतंत्राचा अवलंब करूनही वेगानं पालटत चाललेल्या मूल्यव्यवस्थेच्या स्थित्यंतर पर्वाकडे गंभीरपणे अंगुलिनिर्देश करणारी भेण्डे यांची ही कादंबरी आहे.

'काजळल्या दिशा' ही कादंबरी २००० साली प्रकाशित झाली. प्रा. शिवराम आणि यशवंत ही दोन विरुद्ध स्वभावाची काळी-पांढरी व्यक्तिमत्त्वे आहेत. शहरात येऊन शिकून शिवरामने उमा या ब्राम्हण स्त्रीशी प्रेमविवाह केला आहे. यशवंता म्हणतो तसा तो एका अर्थाने 'दलित बामन'च झाला आहे. याउलट यशवंता बेकार, अशिक्षीत, गावाच्या उचापती करणारा, अद्वातद्वा बडबडणारा, स्वतःच्या दारिद्र्यासाठी साया समाजाला जबाबदार ठरविणारा, संतप्त दलित तरुण आहे. या कादंबरीचा विषय

शिवराम किंवा यशवंता नाही, तर दलित नेतृत्त्वाची शोकांतिका आणि ते नेतृत्त्व किती संधीसाधू आहे हा आहे. केवळ आपल्या उपद्रव्य मूल्यावर जगणारे, तोंडदेखल्या दलितांच्या कळवळ्याची भाषा बोलणारे, ढोंगी आणि केवळ स्वतःची तुंबडी भरणारे दलित नेतृत्त्व याची विदारक कहाणी ही कादंबरी सांगते.

**सारांश:**

सुभाष भेण्डे यांनी १९७० नंतर कादंबरी लेखनाला सुरुवात केली. त्यामुळे १९६० नंतरच्या महत्त्वाच्या कादंबरीकारांमध्ये त्यांचा समावेश करावा लागेल. सुभाष भेण्डे यांच्या सर्वच लेखनात एक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यातील ताजेपणा आणि समकालीनता. ऐतिहासिक, पौराणिक काळात ते फारसे रमत नाहीत. डॉ. सुभाष भेण्डे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून, विनोदातून व गंभीर कथांतून मध्यमवर्गीयांची सुखदुःखे उत्कटपणे व्यक्त केलेली आहे. त्यांच्या साहित्यातून मुंबई, पुणे, सांगली या विभागांची पार्श्वभूमी येते.

**संदर्भ:**

१) प्रल्हाद वडेर, 'सुभाष भेण्डे यांचे साहित्यविश्व' वि.श. चौगुले यांचा लेख. 'वाङ्मयीन संस्कृतीबद्दल प्रेम असणारा रसिक लेखक' प्र.आ. २००२, पृ.२०२.
२) तत्रैव, पृ. १६९.
३) तत्रैव, पृ. २०५.
४) तत्रैव, पृ. २०८.
५) दैनिक महानगर, २० एप्रिल, १९९४, पृ. ९.
६) (संपा.) दिनकर शिलेदार, 'आयुष्य व्यापणारा छंद' सुभाष भेण्डे, 'प्रवास, संगीत आणि गप्पा, टप्पा', 'आपले छंद' दिवाळी अंक २००३, पृ. ९७.
७) भेण्डे सुभाष, साहित्यसूची दिवाळी अंक २००३, पृ. १३९.
८) (संपा.) दिनकर शिलेदार, उनि, पृ. ९७.
९) भेण्डे सुभाष, उनि. पृ. १३९.